# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या ३० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.१४ मार्च, २०२३ दुपारी १२:०० वा.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)



प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिसभेची ३० वी बैठक मंगळवार, दि.१४ मार्च, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा.कुलगुरु महोदया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - कुलगुरु | अध्यक्षा | उपस्थित |
| २) | डॉ. राजेश दत्तात्रय गादेवार, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले<br>प्रभारी अधिष्ठाता - विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ४) | प्राचार्य डॉ. शंकरराव किसनराव पाटील<br>प्रभारी अधिष्ठाता-वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य | अनुपस्थित |
| ५) | डॉ. सिद्राम नारायण सलवदे<br>प्रभारी अधिष्ठाता - मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. विष्णू पांडुरंग शिखरे<br>प्रभारी अधिष्ठाता - आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ७) | डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य | उपस्थित |
| ८) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सचिन श्यामसुंदर लड्डा, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर<br>(मा. प्रभारी शिक्षण संचालक (उ.शि.), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी) | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ११) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १२) | प्रा. डॉ. गौतम सुभाना कांबळे, प्र. संचालक, ज्ञानस्रोत केंद्र | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे, प्र.संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग | सदस्य | उपस्थित |
| १५) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| १६) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| १७) | प्राचार्य डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे | सदस्य | उपस्थित |
| १८) | प्राचार्य डॉ. सत्यजित कांतिलाल शाह | सदस्य | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १९) | प्राचार्य डॉ. राजेंद्रकुमार नारायणराव शेंडगे | सदस्य | उपस्थित |
| २०) | प्राचार्य डॉ. सुनिल धोंडिबा हेळकर | सदस्य | उपस्थित |
| २१) | प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिरा कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| २२) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | उपस्थित |
| २३) | श्री. अजिंक्यराणा राजन पाटील | सदस्य | अनुपस्थित |
| २४) | श्रीमती वैशाली जितेंद्र साठे | सदस्या | उपस्थित |
| २५) | श्री. सुरज बब्रुवाहन रोंगे | सदस्य | उपस्थित |
| २६) | श्री. वैभव रणजित गांधी | सदस्य | अनुपस्थित |
| २७) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| २८) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| २९) | डॉ. श्रीमती वंदना संतोष गवळी | सदस्या | उपस्थित |
| ३०) | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | सदस्य | उपस्थित |
| ३१) | डॉ. शिरीष नागनाथ भोसले | सदस्य | उपस्थित |
| ३२) | डॉ. विरभद्र चनबस दंडे | सदस्य | उपस्थित |
| ३३) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ३४) | डॉ. शिरीष विठ्ठल शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ३५) | डॉ. नितीन लहानू तळपाडे | सदस्य | उपस्थित |
| ३६) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ३७) | डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला | सदस्य | उपस्थित |
| ३८) | डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड | सदस्या | उपस्थित |
| ३९) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| ४०) | डॉ. विकास दादाभाऊ कडू | सदस्य | उपस्थित |
| ४१) | डॉ. श्रीमती माया जगदीश पाटील | सदस्या | उपस्थित |
| ४२) | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | सदस्य | उपस्थित |
| ४३) | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | सदस्य | उपस्थित |
| ४४) | श्री. अजितकुमार बापुराव संगवे | सदस्य | उपस्थित |
| ४५) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| ४६) | श्री. अजिंक्य तानाजी देशमुख | सदस्य | उपस्थित |
| ४७) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| ४८) | ॲड. उषा नंदकुमार पवार | सदस्या | उपस्थित |
| ४९) | श्री. यतिराज चंदक्रांत होनमाने | सदस्य | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| ५०) | ॲड. नीता सुरेशबाबू मंकणी | सदस्या | उपस्थित |
| ५१) | श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती | सदस्या | अनुपस्थित |
| ५२) | श्री. संजय नामदेव साळुंखे | सदस्य | उपस्थित |
| ५३) | श्री. सुदर्शन मसु यादव | सदस्य | उपस्थित |
| ५४) | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | सदस्य | उपस्थित |
| ५५) | श्री. माधव धोंडोपंत देशपांडे | सदस्य | उपस्थित |
| ५६) | श्री. सुरज ज्ञानोबा मस्के | सदस्य | उपस्थित |
| ५७) | प्रा. डॉ. धन्यकुमार जिनपाल बिराजदार | सदस्य | अनुपस्थित |
| ५८) | डॉ. मंगेश मोहन वेदपाठक | सदस्य | उपस्थित |
| ५९) | ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत | सदस्या | उपस्थित |
| ६०) | श्रीमती रोहिणी आर. तडवळकर | सदस्या | उपस्थित |
| ६१) | श्रीमती माधवी श्रीपाद पारेकर | सदस्या | उपस्थित |
| ६२) | श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी | सदस्य | उपस्थित |
| ६३) | श्री. राम सातपुते, विधानसभा सदस्य | सदस्य | अनुपस्थित |
| ६४) | श्री. यशवंत विठ्ठल माने, विधानसभा सदस्य | सदस्य | अनुपस्थित |
| ६५) | श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, विधानपरिषद सदस्य | सदस्य | अनुपस्थित |
| ६६) | प्रा. डॉ. विकास घुटे, प्र.कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**अभिनंदनाचे ठराव:**

१) विद्यापीठाच्या स्थापनेपासून मागील २० वर्षामध्ये विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीचा जो प्रश्न प्रलंबित होता व निधीचा मोठा प्रश्न होता हे प्रश्न सन्माननीय कुलगुरु यांनी पाठपुरावा करुन अतिशय धाडसाने मार्गी लावून इमारत पूर्णत्वास आणली व त्यासाठी शासनाकडे रु.५५ कोटी निधीची तरतूद करुन घेतली याबद्दल सभागृहाच्या वतीने अभिनंदनाचा ठराव श्री. सचिन गायकवाड यांनी मांडला. त्यास श्रीमती पद्मजादेवी मोहिते-पाटील यांनी अनुमोदन दिल्यानंतर सर्व सदस्यांनी सुध्दा अभिनंदन करुन सदरचा ठराव एकमताने मंजूर केला.

२) विद्यापीठाच्या सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन हे प्लॅन (Plan) या शिर्षकामधून नॉनप्लॅन (Non-Plan) या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली होणार आहे, तसेच सन २०१० पासून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध कारणास्तव शासनाकडे प्रलंबित असलेल्या रकमांचा, थकित रकमांचे रोखीकरण, वैद्यकिय प्रतिपूर्ती देयके व इतर जवळपास ७.१५ कोटी रुपयांच्या रकमा शासनाकडून मंजूर करुन घेतल्याबद्दल सभागृहाच्या वतीने अभिनंदनाचा ठराव श्री. सचिन गायकवाड यांनी मांडला. त्यास डॉ. सिद्राम सलवदे यांनी अनुमोदन दिल्यानंतर सर्व सदस्यांनी सुध्दा अभिनंदन करुन सदरचा ठराव एकमताने मंजूर केला.

**शोक प्रस्ताव:**

प्रा. रोहन कोरे यांचे अपघाती दुख:द निधन झाल्याने श्री. चनबसप्पा बंकुर यांनी शोकप्रस्ताव मांडला, त्यास प्राचार्य डॉ. निवृत्ती पवार यांनी अनुमोदन दिले.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. तसेच नव्याने नियुक्त झालेल्या श्रीमती रोहिणी तडवळकर यांची ही पहिलीच बैठक असल्याने मा.कुलगुरु महोदया यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

अधिसभेच्या या बैठकीस १) डॉ. विष्णू शिखरे, प्र.अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, २) डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे प्रतिनिधी) व ३) श्री. महादेव कमळे यांनी दुरध्वरीद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

प्र.कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा. कुलगुरुंना अधिसभेच्या २९ व्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरु यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

**अ.क्र. आस्थापना विभाग**

१. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदाची जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन त्यास अनुसरुन प्राप्त आवेदनपत्रांची छाननी प्रक्रिया पूर्ण झालेली असून लवकरच निवड समितीमार्फत निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

**अभियांत्रिकी विभाग**

२. प्रस्तुत विद्यापीठाच्या विस्तारासाठी संपादीत करण्यात आलेल्या ४८२ एकर परिसरामध्ये नव्याने बांधण्यात येणाऱ्या मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीचे चौथ्या मजल्याचे स्लॅब व भिंत बांधकाम पुर्ण झाले असून स्थापत्य काम अंतिम टप्प्यात आहे.

३. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारक व टॉवर बांधकाम करणे या कामास प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे.

**अभ्यासमंडळे विभाग**

४. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या प्रचलित नियमानुसार दर तीन वर्षांनी सर्व अभ्यासक्रम २०% बदल करुन सुधारित करण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून १) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा २) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा ३) मानवविज्ञान विद्याशाखा ४) आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा या चारही विद्याशाखे अंतर्गत सुधारित होणारे पदवी भाग-२ व पदव्युत्तर भाग-१ चे अभ्यासक्रम संबंधित विषयांच्या उपसमित्यांच्या बैठका विद्यापीठ कार्यालयात आयोजित करुन, सुधारित अभ्यासक्रम तयार करुन घेण्याची प्रक्रीया अभ्यासमंडळे विभागाकडून सुरु आहे.

५. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये सर्व संलग्न महाविद्यालये व विद्यापीठ परिसर संकुलांकडून राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय/राज्य/विभागीय पातळीवर सुधारित अभ्यासक्रमावर आयोजित चर्चासत्र, कार्यशाळा व परिषदांसाठी एकूण ४२ प्रस्तावांना विद्यापीठकडून अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

**व्याख्यानमाला विभाग**

६. प्रस्तुत विद्यापीठ व Human Upliftment and Development Association, Mumbai (HUDA). यांच्या संयुक्त विद्यामाने हुडा असोशिएशन व्याख्यानमाला २०२२-२३ सोमवार दि.१४ नोंव्हेबर, २०२२ रोजी मा. श्री. सचिन पवार, पुणे यांचे "The Role of Students and Youth in the Reconstruction of Society" या विषयावर ऑफलाईन व ऑनलाईन प्रणालीव्दारे आयोजन करण्यात आले होते.

७. प्रस्तुत विद्यापीठ व डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार चारिटेबल ट्रस्ट, नागपूर आणि लाभसेटवार फाऊंडेशन, यु.एस.ए. यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. अनंत ॲन्ड लता लाभसेटवार व्याख्यानमाला २०२३-२४ सोमवार दि.२३ फेब्रुवारी, २०२३ रोजी मा. श्री. रविन्द्र केसकर, उस्मानाबाद यांचे "सामाजिक समता आणि प्रसार माध्यमांची भूमिका" या विषयावर ऑफलाईन व ऑनलाईन प्रणालीव्दारे आयोजन करण्यात आले होते.

**शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग: -**

८. प्रस्तुत विद्यापीठाची सन २०२४ ते २०२९ या कालावधीची पंचवार्षिक सर्वसमावेशक सम्यक योजना (बृहत आराखडा) तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

९. प्रस्तूत विद्यापीठाशी संलग्नित ८३ महाविद्यालयांचे शैक्षणिक लेखापरीक्षण (AAA) ची कार्यवही पूर्ण झाली आहे. व लेखा परिक्षणाचे प्रमाणपत्र तयार करण्याचे कार्यवाही सुरु आहे

**परीक्षा व मूल्यमापन विभाग: -**

१०. प्रस्तुत विद्यापीठाच्या ऑक्टोंबर / नोव्हेंबर २०२२ च्या परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे On Screen Evaluation पध्दतीने करण्यासाठी संलग्नित महाविद्यालयात १७ On Screen Evaluation केंद्र स्थापन करण्यात आलेले आहेत.

**वित्त व लेखा विभाग: -**

११. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १३५ (२) नुसार वेळेत पूर्ण केले असून त्यास वित्त व लेखा समिती, व्यवस्थापन परिषद व अधिसभा यांनी मान्यता दिली दिली आहे.

१२. थकीत वेतन मिळण्याकरिता सुधारित प्रस्ताव सहसंचालक उच्च शिक्षण, सोलापूर यांचे मार्फत शासनाकडे सादर केला आहे. त्यानुसार सदर थकीत अनुदानापैकी ५०% रक्कम विद्यापीठास प्राप्त झाली आहे.

**ज्ञानस्त्रोत केंद्र: -**

१३. ज्ञानस्त्रोत केंद्राकडून Ph.D शोधप्रबंध तपासण्यासाठी नवीन Turnitine Plagiarism Software खरेदी करण्यात आलेल्या Software व्दारे शोधप्रबंध तपासण्याचे काम सुरु आहे

१४. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची जंयती ज्ञानस्त्रोत केंद्राकडून साजरी करण्यात आली व जयंतीनिमित्ताने दि.०६/०२/२३ रोजी आयोजित केलेल्या उपक्रमामध्ये उत्कृष्ट वाचक शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थीनीची निवड करण्यात येऊन त्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र देण्यात आले.

**क्रीडा विभाग: -**

१५. २४ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२२-२३ स्पर्धा दि.०३ ते ०७ डिसेंबर २०२२ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरगांबाद येथे आयोजित करण्यात आला होता. सदर स्पर्धेत प्रस्तुत विद्यापीठाच्या दहा संघानी सहभाग नोंदविला आहे. सदर स्पर्धेमध्ये ॲथलेटिकस क्रीडा प्रकारात प्रस्तुत विद्यापीठाच्या कु. संतोषी देशमुख या खेळाडूंने थाळी फेक या क्रीडा प्रकारात महिलांच्या गटांमध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले आहे तसेच श्री. पृथ्वीराज गोडसे या खेळाडूंने थाळी फेक या क्रीडा प्रकारात पुरुषांच्या गटामध्ये कांस्य पदक प्राप्त केले आहे. सदर प्राविण्य प्राप्त खेळाडू व संघ प्रशिक्षक/व्यवस्थापक यांचा गौरव करण्यात आला.

**राष्ट्रीय सेवा योजना:**

१६. दि.१५/११/२०२२ ते दि.२१/११/२०२२ या कालावधीमध्ये गुलबर्गा विद्यापीठ, कलबुर्गी, कर्नाटक येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबीरामध्ये प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयातून एकुण ०५ मुले व ०५ मुली व ०१ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते.

१७. दि.२६/०१/२०२३ रोजी Rajpath, New Delhi या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या परेड २०२३ या करिता प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयातील श्री. सत्यजीत बाळू चव्हाण या स्वयंसेवकाची निवड झाली आहे.

१८. दि.२६/०१/२०२३ रोजी शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे होणा-या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन रा.से.यो. स्वयंसेवक संचलन (परेड) करिता प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयातून १. कु. नागवेणी महालिंग स्वामी २. कु. प्रतिभा राजकुमार बगले व ३. श्री. सोहेल जावेद पटेल असे एकूण ०३ जणांची निवड झाली आहे.

**विद्यार्थी विकास विभाग:**

१९. राजभवन आयोजित इंद्रधनुष्य युवा महोत्सवात नकला या कलाप्रकारात प्रथम, चित्रकला या कलाप्रकारात तृतीय, शास्त्रीय नृत्य या कलाप्रकारात द्वितीय, भारतीय शास्त्रीय गायन या कलाप्रकारात तृतीय क्रमांक तर स्थळचित्रण या कलाप्रकारात द्वितीय तर नाट्य संगीत या कलाप्रकारात प्रथम क्रमांक असे एकुण सहा बक्षिसे मिळविले आहेत. महोत्सवात यशस्वी होणाऱ्या कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

२०. असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सव दि.२४ ते २८ फेब्रुवारी २०२३ या दरम्यान जैन विद्यापीठ, बेंगलोर येथे आयोजित करण्यात आला होता सदर युवा महोत्सवात एकुण चार कलाकारांनी सहभाग नोंदविला होता. या युवा महोत्सवात. प्रस्तूत विद्यापीठास तिन सुवर्ण तर एक रौप्य पदक मिळाले आहे.

**नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळ: -**

२१. प्रस्तुत विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटरला "MSINS इनोव्हेशन मिशन" या उपक्रमातंर्गत प्रस्तुत विद्यापीठाने स्थापन केलेल्या इन्क्युबशेन सेंटरला भाडेकराराने विद्यापीठामधील जागा उपलब्ध करुन देण्याकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मान्यता दिलेली आहे.

२२. मा. महामहिम राज्यपाल महोदय यांच्या कार्यालयाकडून आविष्कार या संशोधन महोत्सवाचे प्रतिवर्षी आयोजन केले जाते. त्यानुसार विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्स्व २०२२ दि. २२/१२/२०२२ ते २३/१२/२०२२ रोजी एम.आय.टी. कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरींग जामगाव रोड बार्शी येथे व्यवस्थितरित्या संपन्न झाला. विद्यापीठस्तरीय आविष्कार महोत्सवातून ४८ स्पर्धक निवडले गेले होते व तसेच दिनांक १२ ते १५ जानेवारी २०२३ रोजी आंतरविद्यापीठ राज्यस्तरीय संशोधन महोत्स्व आविष्कार २०२२ चे आयोजन सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ येथे करण्यात आली व त्यामधून ०४ स्पर्धक निवडले गेले आहेत.

२३. प्रस्तुत विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहयर्च मंडळमधील उद्यम-PAHSUI फॉउडेशन मार्फत दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी सोलापूर स्टार्टअप यांत्रेचे जिल्हास्तरीय सादरीकरण स्पर्धाचे पारितोषिक वितरण कार्यक्रम विद्यापीठ सभागृहात आयोजित करण्यात आले होती.

**आरोग्य केंद्र**

२४. प्रस्तुत विद्यापीठातील नियमित शिक्षक, शिक्षकेत्तर व कंत्राटी कर्मचारी यांची सोलापूर शहरातील नोबल हॉस्पिटल यांच्या सहकार्याने मोफत बी.पी. शुगर तसेच सर्व साधारण रक्त तपासणी करण्यात आले आहे.

**भाषा व वाङ्मय संकुल: -**

२५. भाषा व वाङमय संकुल प्राकृत विभाग आणि आचार्य जंबूसागर ग्रंथमाला, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्राकृत व्याकरण या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

२६. भाषा व वाङमय संकुलातील हिंदी विभागामार्फत प्रथम वर्षातील विद्यार्थ्याकरिता मा. डॉ. वरुण शर्मा सहायक प्राध्यापक, दर्शनशास्त्र विभाग, पद्यश्री पद्मा सचदेव राजकीय स्नातकोत्तर कन्या महाविद्यालय जम्मू, जम्मू-कश्मीर यांचे फिल्मा मीमांसा विषयावर दिनांक २३/१२/२०२२ रोजी ऑनलाईमेलद्वारे व्याख्यान घेण्यात आले.

**सामाजिक शास्त्रे संकुल :-**

२७. दि. २३ नोंव्हेबर, ते ३० डिसेंबर दरम्यान प्रागैतिहास या विषयावर डॉ. प्राची जोशी, शर्मा हेरिटेज रिसर्च सेन्टर चेन्नई यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

२८. मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र चिचोलकर लिखित एक ग्रंथाचे प्रकाशन नवी दिल्ली येथील ग्यान पब्लिकेशनद्वारे करण्यात आले. या ग्रंथाचे शीर्षक "Social Media for Participatory Development" असे आहे.

**वाणिज्य व व्यवस्थापन संकुल: -**

२९. Intellectual property & patent drafting या वर्कशॉप मध्ये वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील सर्व प्राध्यापकांनी दि.११/११/२०२२ रोजी सहभाग नोंदविला होता.

३०. दि. १४/१२/२०२२ या रोजी Opportunities in Import Export या विषयावरील व्याख्यान आयोजन करण्यात आले.

३१. दि.२२ /१२/२०२२ ते २३/१२/२०२२ या दरम्यान अविष्कार संशोधन महोत्सवासाठी एम.बी.ए. भाग-२ मधील दोन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. तसेच एका विद्यार्थ्यांने (श्री. ओंकार शेटे) तृतीय पारितोषिक मिळविले आहे.

**ललितकला व कला संकुल: -**

३२. ललितकला व कला संकुलामध्ये नाट्यशास्त्र विभागाकडील मराठी रंगभूमी दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी एकपात्री अभिनयाचे सादरीकरण केले.

३३. ललितकला व कला संकुलामध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून Master of Visual Arts (painting) (M.V.A) हा ०२ वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे.

**तंत्रज्ञान संकुल: -**

३४. तंत्रज्ञान संकुलातील तीन प्राध्यापकांनी आकृतीटेकपल्स प्रोजेक्ट् अंतर्गत फुडटेक्नॉलॉजी प्रकल्पावर संशोधन करण्यासाठी BARC, Trombay, Mumbai येथे भेट देवून प्रशिक्षण घेतले आहे.

३५. तंत्रज्ञान संकुलातील विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी प्रस्तुत विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ उद्यम PAHSUS फाउंडेशन व रसायनशास्त्र संकुलाच्या संयुक्त विद्यमाने Intellectual Property and Patent Drafting या एक दिवसीय कार्यशाळा कार्यक्रमात सहभाग नोंदवला आहे.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] **अधिसभेच्या दि. ०६ डिसेंबर, २०२२ रोजी झालेल्या २८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

टिपणी: अधिसभेची २८ वी बैठक दि.०६ डिसेंबर, २०२२ रोजी संपन्न झाली असून सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव पारित झाला.

| | |
|---|---|
| ठराव: | डॉ. विश्वनाथ कराड यांना डी. लिट (D.Lit.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत सभागृहात उपस्थित सदस्यांपैकी काही सदस्यांनी मतदानाची मागणी केल्याने २०१९ चा परिनियम क्र.४ मधील १३(१) नुसार, प्रस्तावाच्या बाजूने २७ सदस्यांनी व प्रस्तावाच्या विरुध्द २१ सदस्यांनी हात वर करुन मत नोंदविले.<br>त्यानंतर काही सदस्यांच्या मागणी नुसार २०१९ चा परिनियम क्र.४ मधील १३(२) नुसार, मतपत्रिकेद्वारे गुप्त मतदान घेण्यात आले असता, प्रस्तावाच्या बाजूने २६ सदस्यांनी व प्रस्तावाच्या विरुध्द २२ सदस्यांनी मतदान केले.<br>सदर दोन्ही प्रक्रियेवेळी एक सदस्य अनुपस्थित होते.<br>सन २०१८ चा एकरुप परिनियम क्र.३ मधील नियम क्र.३ (५) नुसार, प्रस्तावाच्या मंजूरीसाठी उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश इतक्या सदस्यांनी पाठिंबा दर्शविणे आवश्यक असते. सदर बैठकीत उपस्थित दोन तृतीयांश सदस्यांनी सदर प्रस्तावास पाठिंबा दर्शविला नसल्याने डॉ. विश्वनाथ कराड यांना डी. लिट. (D.Lit.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस नामंजूर करण्यात आली. |

सबब, अधिसभेचा दि.०६ डिसेंबर, २०२२ रोजी झालेल्या २८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **अधिसभेच्या दि. ०६ डिसेंबर, २०२२ रोजी झालेल्या २८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.** |

[ २ ] २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील नियम क्र. ६ (१६) नुसार अधिसभा सदस्यांनी **विचारलेले प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे.**

टिपणी: २०१९ चा एकरुप परिनियम क्र. ४ नुसार, प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेले उत्तर, २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील ६ (१४) अन्वये अधिसभेच्या सदस्यांना पाठविण्यात येतील.

| | |
|---|---|
| ठराव: | १) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:४० वाजता सुरु झाला व दुपारी ०१:४० वाजता संपला. वेळेअभावी प्रश्न क्र. ०८ ते २६ व त्यावरील उपप्रश्न विचारता आले नाहीत.<br>२) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे यांची प्रत सोबत जोडली आहे. (जोडपत्र “अ”) |

**[ ३ ] विद्यापीठाचे सन २०२२-२३ चे सुधारित अर्थसंकल्प व सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३३(१) नुसार विद्यापीठाचे सन २०२२-२३ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२३-२४ चा मूळ अर्थसंकल्प तयार करण्याकरिता समान लेखा संहिता कलम २.१२ (i) नुसार उपसमिती मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे गठीत करण्यात आली होती.

| अ. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील | अध्यक्ष |
| २) | प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे | सदस्य |
| ३) | डॉ. श्रीमती किर्ती पांडे | सदस्य |
| ४) | सीए श्रेणीक शाह | सदस्य सचिव |

उपरोक्त उपसमितीने दि. २६ ते ३०/१२/२०२२ दरम्यान विविध विभाग/संकुले यांच्या प्रमुखांसोबत त्यांची मागणी, जमा व खर्चाचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा केली. मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष जमा व खर्च, त्यांची चालू वर्षातील प्रत्यक्ष जमा, खर्च व त्यांची मागणी तसेच पुढील वर्षातील होणारी जमा व खर्चाचे नियोजन व उपलब्ध निधी इत्यादीबाबत आढावा घेण्यात आला व आवर्ती खर्चात वरचेवर होणारी वाढ ही बाब विचारात घेऊन एकूण खर्चात कपात करुन सुधारित व मूळ अंदाजपत्रकीय अंदाज ठरविण्यात आले आहेत व सन २०२२-२३ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२३-२४ चा मूळ अर्थसंकल्पाचा मसूदा तयार करुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९४(६)(क) नुसार वित्त व लेखा समितीच्या दि.३१/०१/२०२३ रोजी झालेल्या सभेसमोर विषय क्र.०२ नुसार सादर केला असता, त्यावर सर्वकष चर्चा होवून त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव: | सन २०२२-२३ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पावर सर्वंकष चर्चा होऊन दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

वरीलप्रमाणे वित्त व लेखा समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या दि.०२/०२/२०२३ रोजी झालेल्या सभेत विषय क्र.०३ अन्वये विचारार्थ सादर केली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव: | सन २०२२-२३ च्या सुधारित अर्थसंकल्पास व सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दुरुस्तीसह स्विकारुन, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ज) अन्वये मान्यता देऊन अधिसभेस शिफारस करण्यात आली. |

सबब, विद्यापीठाचे सन २०२२-२३ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली मान्यतेची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २९(छ) नुसार मान्यतेसाठी विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | सीए श्रेणिक शाह यांनी सन २०२२-२३ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२३-२४ चा मूळ अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यास श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर अधिसभा सदस्यांनी मुद्देसूद चर्चा करुन आपले विचार व्यक्त केले.<br>त्यानंतर विद्यापीठाचा सन २०२२-२३ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२३-२४ च्या मूळ अर्थसंकल्पास व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते दुरुस्तींसह मान्यता देण्यात आली. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर

[ ४ ] **अधिसभा सदस्य श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"विद्यापीठाचे विविध खेळाचे संघ आंतरविद्यापीठ स्पर्धेत दर्जेदार होण्यासाठी, त्यांची कामगिरी अव्वल दर्जाची होण्यासाठी सोलापूर किंवा राज्यातील एन.आय.एस. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सराव शिबिर आणि प्रत्यक्ष स्पर्धेत संबंधित प्रशिक्षकास भाग घेण्यासाठीचा ठराव ही अधिसभा शारीरिक शिक्षण मंडळास (Board of Sports) करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा प्रस्ताव श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिरा कोळेकर यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते शारीरिक शिक्षण मंडळाकडे (Board of Sports) शिफारस करण्यात आली.** |

[ ५ ] अधिसभा सदस्य डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"पर्यावरण शास्त्र हा विषय पदवी स्तरावर सगळीकडे अनिवार्य आहे. पण सद्य:स्थिती पाहता बऱ्याच कॉलेज वर पर्यावरण शास्त्र या विषयात पारंगत नसणारे (पर्यावरण शास्त्र हा विषय सोडून दुसरे विषय शिक्षक) उमेदवार हा विषय शिकवतात. म्हणजेच या विषयाचा वर्कलोड पर्यावरण शास्त्र सोडून दुसऱ्या विषय शिक्षकांना देतात (Eg. Chemistry, Botany, Zoology, Microbiology, Physics, and Other).

सद्य:स्थिती पाहता, पर्यावरण शास्त्र या विषयामध्ये पात्र उमेदवारांची संख्या भरपूर आहे. पदवी स्तरावर पर्यावरण शास्त्र हा विषय शिकवण्यासाठी पर्यावरण शास्त्र यामध्येच पात्र उमेदवारांना अध्यापनाची संधी द्यावी व विषयाला न्याय मिळावा. सदर ठरावास मान्यता मिळावी व तो लवकर अंमलात आणावा ही नम्र विनंती."

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा प्रस्ताव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडल्यानंतर त्यास ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला.** |

[ ६ ] अधिसभा सदस्य डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य अंतर्गत Lab on Wheel या उपक्रमावर पूर्ण वेळ Science Demonstrator या पदाची भरती करावी."

| | |
|---|---|
| ठरावः | सदरचा प्रस्ताव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

[ ७ ] अधिसभा सदस्य श्री. संजय नामदेव साळुंखे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"सोलापूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धामध्ये जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या व प्रथम, द्वितीय वा तृतीय क्रमांक पटकावलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्री. संजय नामदेव साळुंखे यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली. |

[ ८ ] अधिसभा सदस्य श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"प्रस्तुत विद्यापीठातील सामाजिक शास्त्र संकुलास "छत्रपती संभाजी महाराज सामाजिकशात्र संकुल" असे नाव देण्यात यावे, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. यतिराज चंद्रकांत होनमाने यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

[ ९ ] अधिसभा सदस्या ॲड उषा नंदकुमार पवार यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सभागृहास "राष्ट्रमाता जिजाऊ व्यवस्थापन परिषद सभागृह" असे नाव देण्यात यावे, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठरावः | सदरचा प्रस्ताव ॲड उषा नंदकुमार पवार यांनी मांडल्यानंतर त्यास श्रीमती वैशाली जितेंद्र साठे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली. |

[ १० ] **अधिसभा सदस्य डॉ. शिरीष नागनाथ भोसले यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.**

"Ph.D. theory paper च्या उत्तरपत्रिकेची छायांकीत प्रत विद्यार्थ्यांना देण्याची तरतूद करावी अशी शिफारस ही अधिसभा परीक्षा व मूल्यमापन मंडळास करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा प्रस्ताव डॉ. शिरीष नागनाथ भोसले यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे शिफारस करण्यात आली.** |

[ ११ ] अधिसभा सदस्य डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"Minor research project साठी विद्यापीठाकडून दिल्या जाणाऱ्या Seed Money अनुदानामध्ये वाढ करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. राजेंद्रकुमार नारायणराव शेंडगे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली. |

[ १२ ] अधिसभा सदस्य श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"प्रस्तुत विद्यापीठास "महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र" व "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र" यासाठी शासनाकडून भरीव अनुदान मंजूर झाल्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाच्या अभिनंदनाचा ठराव ही सभा करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. जैनोद्दीन मुल्ला यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्व अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाचे अभिनंदन केले. |

[ १३ ] अधिसभा सदस्या डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"८ जुलै २०१९ च्या शासन परीपत्रकानुसार कॅस (CAS) प्रक्रियेचे आयोजन प्रत्येक महिन्याला करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी मांडल्यानंतर त्यास ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

[ १४ ] अधिसभा सदस्य श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय विध्यार्थ्यांच्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने फेलोशिप योजना सुरु करण्यात यावी."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी मांडल्यानंतर त्यास ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

[ १५ ] अधिसभा सदस्य श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात यावी."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी मांडल्यानंतर त्यास श्रीमती रोहिणी आर. तडवळकर यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

[ १६ ] अधिसभा सदस्य श्री. अजिंक्य तानाजी देशमुख यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठाकडे उत्तरपत्रिका जमा करण्यासाठी झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीचा तपशील नमूद करणारे परिपत्रक विद्यापीठाकडून तयार करुन संलग्न महाविद्यालयांना पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्री. अजिंक्य तानाजी देशमुख यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. अजिंक्य तानाजी देशमुख यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

मा. कुलगुरु, प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून वंदे मातरम नंतर बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले.

कुलसचिव
सदस्य सचिव, अधिसभा

कुलगुरु
अध्यक्ष, अधिसभा

जोडपत्र "अ"

## विषय क्र. ०२ चे सहपत्र

## अधिसभेच्या मंगळवार, दि.१४ मार्च, २०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे

| | | |
|---|---|---|
| **श्री. अजितकुमार बापुराव संगवे** | | **श्री. सुधाकर तुकाराम सरवदे** |
| प्रश्न १ | | जोपर्यंत सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म जनरेट होत नाहीत, तोपर्यंत परीक्षा फॉर्म भरण्याचे वेळापत्रक परीक्षा विभाग जाहीर करु शकत नाही का? |
| उत्तर | | वरील प्रश्नाचा अर्थबोध होत नाही. |
| | • | परीक्षा विभाग परीक्षा अर्ज भरण्याचे वेळापत्रक जाहीर करतो, परंतू, काही विद्यार्थ्यांचे आदल्या दिवशापर्यंत परीक्षा अर्ज जनरेट होत नाही असे वारंवार घडते यासाठी वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर किती दिवस अगोदर संबंधित परीक्षेचा सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज जनरेट होतील. |
| | ⇨ | परीक्षा अर्ज भरण्याचा कालावधी जाहीर करताना परीक्षा अर्ज उपलब्ध होतील याची आवश्यक माहिती घेऊनच तारखा जाहीर केल्या जातात. परंतू, संगणकीय तांत्रिक बाबी, बाह्य स्त्रोत फर्ममुळे काही वेळा दिलेल्या मुदतीत परीक्षा अर्ज जनरेट होत नाहीत, अशा वेळी परीक्षा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना मुदत वाढ दिली जाते. यावेळी विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क ही आकारले जात नाही. यापुढे दिलेल्या मुदतीत परीक्षा अर्ज जनरेट होतील याची दक्षता घेण्यात येईल किंबहुना दिलेल्या तारेखपूर्वी फॉर्म जनरेशन, परीक्षा अर्ज उपलब्ध करुन देण्यात येतील याची खात्री झालेनंतरच परीक्षा अर्ज भरण्याची मुदत देण्यात येईल. |
| | • | हॉल तिकीट वेळेत जनरेट होण्यासाठी विद्यापीठाकडून काही उपाययोजना करण्यात येणार आहेत का? |
| | ⇨ | |
| प्रश्न २ | | जोपर्यंत संबंधित अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे परीक्षा हॉल तिकीट जनरेट होत नाहीत, तोपर्यंत संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षेत अंतिम वेळापत्रक परीक्षा विभाग जाहीर करु शकत नाही का? |
| उत्तर | | प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार अंतिम वेळापत्रक प्रसिध्द झाल्यानंतरच संबंधित अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे परीक्षा हॉल तिकीट जनरेट होतात. |
| | • | परीक्षा हॉल तिकिट बाबतीत विद्यार्थ्यांची ओरड आहे. परीक्षा उद्या आहे आणि आदल्या दिवसापर्यंत काही विद्यार्थ्यांचे परीक्षा हॉल तिकीट जनरेट होत नाही यासाठी अंतिम वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर किती दिवस अगोदर संबंधित परीक्षेच्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षेचे हॉल तिकीट जनरेट होतील. |
| | ⇨ | पुढच्या परीक्षेवेळी एक आठवडा अगोदर हॉल तिकीट जनरेट होतील. |
| | • | बी.ए.ची पदवी असेल तर ३ + २ असा नवीन नियम निघाला आहे. अनेक विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म त्यांचे पाच वर्ष पूर्ण झाले असताना ही काही महाविद्यालयांनी त्यांचे परीक्षा फॉर्म भरुन घेतले आहेत. तर त्या महाविद्यालयांना आपण तशा सूचना दिल्या नव्हता का? सूचना दिल्या असतील तर परीक्षा फॉर्म का भरुन घेतले जात आहेत, यासंदर्भात काय कार्यवाही केली आहे. |
| | ⇨ | सदरचा प्रश्न हा N+२ UGC नियमाशी संबंधित आहे. दि.२१ फेब्रुवारी, २०१६ ला विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीचे पत्र व विद्यापीठाने निर्णय घेतलेले पत्र सर्व महाविद्यालयांना पाठविलेले होते. यामध्ये N+२ ही सिस्टम Adopt करण्यात आली असल्याचे कळविले होते. |

| | | |
|---|---|---|
| | • | काही विद्यार्थ्यांचे जुने हॉलतिकीट जनरेट झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी नवीन जनरेट झालं, पण जुने हॉलतिकीट त्यांना वाटण्यात आलेली होती, आणि त्याचे सेंटर बदललेले होते, आत जे सेंटर बदललेल विद्यार्थी दुसऱ्या सेंटर मध्ये गेले, मग त्यामध्ये झालेल्या विद्यार्थ्यांच नुकसान विद्यापीठ भरुन देईल का? |
| | ⇨ | हॉलतिकीट संदर्भात जे सांगितल होत ते फारच अगोदर झाल होत, २० ते २५ दिवस अगोदर झालेलं होत. त्याच्यानंतर आपल्याला कळाल्यानंतर १० दिवस असताना ती माहिती कळाली, त्यानंतर आपण त्या वेंडरला कळविले, त्यानंतर ८ दिवस असताना, ते बदल करुन त्यांच्याप्रमाणे हॉलतिकीट जनरेट करण्यात आला, आणि त्या सर्व महाविद्यालयांना परीक्षा विभागातून कळविले गेले, आणि त्यांनी डाऊनलोड कराच होत. |
| | • | आता जे परीक्षा सुरु आहे, फॉर्म भरुन घेणे, हॉलतिकीट जनरेट करणे व परीक्षा Conduct करणे या सगळ्या प्रोसेसला सुसुत्रता यायला किती वेळ लागेल? |
| | ⇨ | |
| | • | एल. एल. एम. चे दोन विद्यार्थी आहेत, त्यांनी रीतसर तक्रार पण केलेली आहे परीक्षा नियंत्रक सरांकडे, त्यांची पहिल्या टर्मची परीक्षा झालेली आहे, आणि दुसऱ्या टर्मची Internal वगैरे सर्व झालाय, आणि सेकंड सेमिस्टरला त्यांना परीक्षेला बसू देण्यात आलेल नाही, त्यांना विद्यापीठाकडून पत्र गेलेल आहे की, एल. एल. बी. आणि एल. एल. एम. मधला गॅप आहे त्यामूळे त्यांना या परीक्षेला बसू देण्यात आलेल नाही, पहिल्या परीक्षेच्या वेळेस हे लक्षात यायला पाहिजे होत, विद्यापीठाच्या आणि परीक्षा नियंत्रकाच्या की त्यांना पहिल्यांदा बसू दिल आणि दुसऱ्यांदा Internal Exam झाली आणि दुसऱ्या परीक्षेला त्यांना बसू दिले नाही, मग आता त्यांच नुकसान आणि शेवटच सेमिस्टर आहे, त्यांच नुकसान कस भरुन काढता येईल? |
| | ⇨ | N+२ हे जे आहे Natural Period आणि २ वर्ष Additional त्याच्यापेक्षा त्यांना एक परीक्षा जास्त द्यायला येत नाही. त्यासाठी आपण Computerised reduction केलेल आहे. ५ वर्षापर्यंत परवानगी मिळते ५ वर्ष संपले की नाही. |

| **डॉ. मंगेश मोहन वेदपाठक** | | **प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार** |
|---|---|---|
| प्रश्न ३ | विद्यापीठाच्या केसेससाठी नियुक्तीचे निकष व वकिलांची फी देण्यासाठी कोणते नियम लावले जातात व प्रत्येक केससाठी किती फी देणे अभिप्रेत आहे? | |
| उत्तर | विद्यापीठ केसेससाठी व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार विविध न्यायालयात कामकाज पाहण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या पॅनल ॲडव्होकेटपैकी वकीलांचे नामनिर्देशन मा.कुलगुरु यांनी केल्यानंतर नियुक्ती करण्यात येवून विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार संबंधित वकीलांना फी अदा करण्यात येते. तसेच पॅनल बाहेरील वकील नेमण्याबाबत मा. कुलगुरु यांनी केलेल्या नामनिर्देशनानुसार संबंधित वकीलांना नेमण्यात येवून मा. कुलगुरु यांच्या मान्यतेने फी अदा करण्यात येते. | |
| | • | ही जे काही फी आहे ते तारखेनुसार घेतली जाते का केस नुसार दिली जाते, तारखेनुसार असेल तर Actualy Amount किती आहे? |
| | ⇨ | सोलापूर न्यायालय, विद्यापीठ महाविद्यालय न्यायालय, पुणे येथील वकीलाच्या व्यावसायिक फीमध्ये २५% ची वाढ झाल्याने (६,०००/- + १,५००/-) एकूण ७,५००/- दिली जाते. तसेच मा.उच्च न्यायालयातील वकिलांना १०,०००/- ला २५% वाढ अशा पध्दतीने फी ठरविलेली आहे आणि बाकीच्या फी केसनुसार असतात. |

| | | |
|---|---|---|
| | • | एका केससाठी एकापेक्षा जास्त वकील नियुक्त असतील, तर त्यांना प्रत्येकी वेगवेगळी फी दिली जाते की त्या केससाठी ठरलेली फी ही विभागून दिली जाते. |
| | ⇨ | पॅनल केलेला असतो. त्यामुळे त्या पॅनलप्रमाणे फी दिली जाते. |
| | • | व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेशिवाय पॅनेलच्या बाहेरचे वकील नेमण्याची तरतूद विद्यापीठ कायद्यात आहे का? |
| | ⇨ | |
| | • | जेव्हा आपण पॅनल तयार करतो तेव्हा पॅनल तयार करीत असताना Counselor म्हणून नेमणूक करायची तरतूद आहे का? |
| | ⇨ | व्यवस्थापन परिषदेमध्ये ज्या ज्या वेळी एखाद्या Counselor ची नेमणूक करण्याची गरज असेल तेव्हा पॅनलमध्ये त्या त्या विषयाचे तज्ज्ञ नसतील त्यावेळी आपण बाहेरच्या व्यक्तीची मदत घेतो. |
| | • | जेव्हा आपण पॅनल विधीज्ञ म्हणून नेमणूक करतो तो सक्षम आणि कायद्याच्या क्षेत्रामध्ये तो ज्ञात आहे म्हणून आपण नेमणूक करीत असतो, त्यांच्या व्यतिरिक्त आपण नेमणूक करु शकतो का? |
| | ⇨ | नेमलेले ते सक्षमच असतात, परंतु एखाद्या केस वाईज त्याला सपोर्ट करण्यासाठी नेमणूक करु शकतो. |
| | • | पॅनल बाहेरील वकीलांची नेमणूक केली जाते त्यावेळेला व्यवस्थापन परिषदेमध्ये याबाबतचा ठराव घेतला जातो का? |
| | ⇨ | होय. |
| | • | जे ते पॅनल आहे त्या पॅनलमध्ये ॲडव्होकेटची संख्या किती आहे? |
| | ⇨ | ४ वकीलांचे पॅनल केल आहे, आणि ४ वकीलांच्या बाहेरील तज्ज्ञ वकीलांना प्रकरणांच्या आवश्यकतेनुसार नियुक्त करण्यास व त्यांना आवश्यकता भासल्यास जास्तीची फी आदा करण्याबाबतचे अधिकार मा. कुलगुरुमहोदयांना देण्यात आले आहेत. |
| | • | आपण पॅनल Appoint करत असताना त्याची Qulification आणि Work Experience पाहून त्यांची नियुक्ती केली जाते, मग आपल्याला Additional Advocate देण्याची गरज का पडते? आणि पडत असेल तर तो जो काही फीचा भूर्दंड आहे तो विद्यापीठाने का सोसावा ते पॅनलवरती Responsibility टाकावी? |
| | ⇨ | पॅनल जे नेमलेल असत आणि पॅनलच्याप्रमाणे एखाद्यावेळी केस जर वेगळ्या पध्दतीची आली, तर त्या केसच्या संदर्भात आपण पॅनलबाहेरील व्यक्तींना आपण नेमतो. |
| | • | दि.२१/०८/२०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये केसवाईज फी ठरवून दिली होती, त्यानंतर एका विशेष केससाठी दि.०८/०२/२०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ॲड. पी. एन. जोशी यांना फक्त एका विशेष केससाठी त्यांना २५,०००/- परकेस अशा प्रकारची फी मंजूर करण्यात आली होती. परंतु दि.०८/०२/२०१६ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये त्यांना २५,०००/- वरुन त्यांच्या विनंतीनुसार ३५,०००/- इतक वाढ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजुर करुन करण्यात आलेली होती. त्यानंतरच्या कुठल्याही व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये फी वाढीसंदर्भात उल्लेख नाही किंवा तशा प्रकारचा ठराव झालेला नाही. |
| | ⇨ | दि.२३/०२/२०१६ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ॲड. पी. एन. जोशी यांना देय असलेली फी २५,०००/- वरुन वाढ करुन ३५,०००/- प्रति प्रकरण देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच Misc. and Out of Pocket Expenses प्रत्यक्षात येणाऱ्या खर्चाच्या मान्यतेचे अधिकार मा. कुलगुरु यांना देण्याचे सर्वानुमते ठरले. |

| | | |
|---|---|---|
| प्रश्न ४ | राष्ट्रहिताच्या दृष्टीने एप्रिल २०१८ ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीमध्ये विद्यापीठात आयोजित व्याख्यानमाला साठी आमंत्रित वक्त्यांच्या निमंत्रणासाठी कोणते निकष लावले आहेत व त्यासाठी आलेला एकूण खर्च किती? | |
| उत्तर | विविध देणगीदार यांच्याकडून प्राप्त देणगीवरील दरवर्षी मिळणाऱ्या व्याजातून विद्यापीठ व देणगीदार यांच्यातील करारानुसार गठीत समितीच्या शिफारशीन्वये व्याख्यात्यांना निमंत्रित केले जाते. त्यासाठी आलेला एकूण खर्च ₹१,२६,६९७/-. | |
| | • | या व्याख्यानमालामध्ये २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये किती खर्च करण्यात आला? |
| | ⇨ | २०२१-२२ मध्ये १३,८४४/- व २०२२-२३ मध्ये ३०,८१८/- इतका खर्च करण्यात आला. |

| डॉ. श्रीमती वंदना संतोष गवळी | | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे |
|---|---|---|
| प्रश्न ५ | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता या पदाच्या भरती प्रक्रियेत मुलाखत झाल्यानंतर "Not Suitable Candidate" अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होण्याची कारणे कोणती आहेत? | |
| उत्तर | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता या पदाच्या दि.०७/१२/२०२२ रोजीच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या दोन उमेदवारांच्या मुलाखतीनंतर निवड समितीने त्यांच्या अहवालात No Candidate is selected असा शेरा दिलेला आहे. | |
| | • | सदर पदासाठी किती पात्र उमेदवारांचे अर्ज आलेले आहेत. |
| | ⇨ | ५ उमेदवारांचे अर्ज आलेले होते आणि त्यामधून २ उमेदवार पात्र झालेले आहेत. |

| श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | | डॉ. समाधान दिगंबर पवार |
|---|---|---|
| प्रश्न ६ | विद्यमान कुलगुरुंच्या काळात विद्यापीठात किती नवीन PG कोर्स सुरु झाले? | |
| उत्तर | विद्यमान कुलगुरुंच्या काळात विद्यापीठात एकूण २५ नवीन PG कोर्सेस सुरु झाले. | |
| | • | कोणते कोर्सेस सुरु झालेले आहेत? |
| | ⇨ | सगळ्यांच्या मागणीनुसार सहपत्र सोबत जोडलेले आहे. |
| प्रश्न ७ | चालू शैक्षणिक वर्षात (२०२२-२३) त्यातील किती कोर्सला प्रवेश नाहीत म्हणून स्थगित केले आहेत? | |
| उत्तर | चालू शैक्षणिक वर्षात (२०२२-२३) प्रवेश नाहीत म्हणून स्थगित केलेल्या कोर्सची संख्या निरंक आहे. | |
| | • | ४ कोर्सेसला शुन्य ॲडमिशन आहे त्याच काय? |
| | ⇨ | सन २०२२-२३ मध्ये ४ कोर्सेसला विद्यार्थी नसल्यामुळे तो कोर्स बंद करण्यात आलेला नाही, विद्यापीठाकडून तात्पुरती स्थगिती आहे. |

(सचिव अधिसभा)
प्र.कुलसचिव